10 APR 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालयांनी क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्न करावेत

## कुलगुरू शिर्के; विद्यापीठात प्राचार्यांची विशेष बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नजीकच्या काळात शैक्षणिक क्षेत्राला नव्या धोरणासह अनेकविध बदलांना सामोरे जावे लागणार आहे. त्यासाठी महाविद्यालयांनी क्षमता ओळखून त्या अधिक वृद्धिंगत करण्याकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित प्राचार्यांच्या विशेष एकदिवसीय बैठकीच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण केव्हाही लागू होऊ शकते. त्यादृष्टीने विद्यापीठ तयार आहे. महाविद्यालयांनी तयारीत राहावे. मात्र, या धोरणापलीकडे अनेक नवनवे अभ्यासक्रम, योजना, उपक्रम आणि मूल्यमापनाच्या अभिनव पद्धती विद्यापीठ अनुदान आयोगाच्या माध्यमातून येत आहेत. या बदलांचा नियमित आढावा घेण्यासाठी आणि त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर एक स्वतंत्र कक्ष निर्माण करावा. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी प्रास्ताविकात नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने येऊ घातलेली आव्हाने, संधी आणि लाभ या अनुषंगाने मांडणी केली. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

10 APR 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विविध आव्हानांवर मात करण्यासाठी नवोपक्रमाशिवाय पर्याय नाही

## डॉ. जी. डी. यादव यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सध्या मानवजातीपुढे इंधन दरवाढीसह ग्लोबल वॉर्मिंगसारखी अनेक नैसर्गिक, मानवनिर्मित आव्हाने उभी आहेत. त्यावर उपाययोजना करावयाच्या, तर नवसंशोधन व नवोपक्रमास चालना देण्याखेरीज पर्याय नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जी. डी. यादव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेजिस, एसयूके संशोधन व विकास फाऊंडेशन (सेक्शन-८ कंपनी) व सांगली येथील सिस्टेड फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्टार्ट-अप सूत्रा' या मालिकेंतर्गत आयोजित 'नवोपक्रमातून राष्ट्रबांधणी' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. डॉ. यादव म्हणाले, भविष्यात पदवी मिळाल्यानंतर नोकरी मागण्याऐवजी नोकऱ्यांची निर्मिती करण्याचे ध्येय प्रत्येक विद्यार्थ्याने बाळगले पाहिजे. आयुष्यात यशस्वी व्हावयाचे असल्यास स्वतःची भाषा उत्तम व्याकरणासह आली तरच अन्य भाषाही उत्तम पद्धतीने येतील. विद्यापीठे ही तर नवसंशोधन आणि नवोपक्रमाची महत्त्वाची केंद्रे आहेत. त्यांनी विद्यार्थी केंद्रित अभ्यासक्रम सुरू केले पाहिजेत. त्याचप्रमाणे नवसंशोधन व नवोपक्रमास चालना देत राहायला हवे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी अपयशाची भीती न बाळगता नवसंकल्पना व नवसंशोधनाचे उपक्रम हाती घेत राहण्याची आवश्यकता आहे. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सिस्टेड फाऊंडेशनचे प्रा. भालबा केळकर व डॉ. सुहास खांबे यांनी लिहिलेल्या 'नवशोधन : मंत्र आणि तंत्र' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. केंद्राचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख यांनी प्रास्ताविक केले. सेक्शन-८ कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. डी. राऊत यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अभियंता हर्षवर्धन पंडित यांनी प्रकाशित पुस्तकाविषयी माहिती दिली. उद्योजक अरविंद देशपांडे यांनी आभार मानले.

पुढारी

# अंतराळातील किरणोत्सर्गाचा हवामानावर परिणाम : प्रा. जैन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सध्या हवामानात होणारे बदल हे अंतराळातील उच्च ऊर्जा किरणोत्सर्ग अर्थात गॅलॅक्टिक कॉस्मिक किरणांमुळे होत असून पृथ्वीच्या हवामानावर मोठा परिणाम होत असल्याचे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अवकाश शास्त्रज्ञ प्रा. राजमल जैन यांनी केले.

आजादी का अमृतमहोत्सव आणि शिवाजी विद्यापीठाचा हिरक महोत्सव या निमित्ताने विद्यापीठाचा पदार्थ विज्ञान अधिविभाग आणि अवकाश संशोधन केंद्र, पन्हाळा यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. जैन यांचे 'सोलर इन्फ्ल्युएन्स ऑन दि अर्थ इन ट्वेंटी फर्स्ट सेंच्युरी' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले होते, त्यावेळी ते बोलत होते.

प्रा. जैन म्हणाले, एकविसाव्या शतकात सूर्यावरील चुंबकीय बदलांमुळे सौरडाग आणि सौरवाद यांचा पृथ्वीवरील वातावरणामध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. गेल्या काही वर्षांपासून सौर डागांची संख्या कमी होत आहे. पृथ्वीकडे येणारी सौर विकिरणे कमी झाली आहेत. यामुळे अंतराळातील उच्च-ऊर्जा किरणोत्सर्ग (गॅलेक्टिक कॉस्मिक किरणे) पृथ्वीच्या वातावरणामध्ये सहज प्रवेश करतात आणि ढगांचे आवरण वाढवून पृथ्वीच्या हवामानावर परिणाम करतात. ही कॉस्मिक किरणे समुद्राच्या तळाशी घन रूपामध्ये असलेल्या कार्बन डायऑक्साईडचे विघटन करत आहेत. त्यामुळे समुद्राच्या पाण्याचे तापमानही वाढत आहे. सोळाव्या शतकात जसे हिमयुग आले होते, तसे येईल आणि त्याच बरोबर मोठ्या प्रमाणात साथीचे आजार सुद्धा वाढण्याचा धोका असल्याचेही त्यांनी सांगितले. स्वागत पदार्थविज्ञान अधिविभागाचे प्रमुख डॉ. के.वाय. राजपुरे यांनी केले. प्रथमेश चौगुले यांनी प्रास्ताविक, ऐश्वर्या फडतरे यांनी परिचय करून दिला. वेदिका चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रतीक्षा कुंभार यांनी आभार मानले. या कार्यक्रमास डॉ. आर. एस. व्हटकर, डॉ. व्ही.जे. फुलारी, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. एम.व्ही. टाकळे, डॉ. व्ही. आर. पुरी, व कोल्हापुरातील विज्ञानप्रेमी नागरिक उपस्थित होते.

सकाळ

# राजर्षी शाहू स्मृती शताब्दी ग्रंथ महोत्सवासाठी आवाहन

**कोल्हापूर :** लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या स्मृती शताब्दी वर्षानिमित्त २८ एप्रिलपासून शाहू ग्रंथ महोत्सव होणार आहे. शाहू छत्रपती मिल परिसरात सलग तीन दिवस हा महोत्सव होणार असून, राज्यातील आणि राज्याबाहेरील शासकीय तसेच इतर प्रकाशनाचे पुस्तक व ग्रंथांचे स्टॉल महोत्सवात असतील. स्टॉलसाठी १८ एप्रिलपर्यंत जिल्हा ग्रंथालय अधिकारी अपर्णा वाईकर, शिवाजी विद्यापीठाचे उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. स्टॉलधारकांना स्टॉलसह इतर आवश्यक साहित्य मोफत पुरवले जाणार असून अठरा एप्रिलपर्यंत आरक्षित केलेल्या प्रकाशक, ग्रंथ विक्रेत्यांनाच स्टॉल दिले जातील. प्रकाशकांना प्रत्येक पुस्तकांवर किमान पंधरा टक्के सूट द्यावी लागेल. ड्रॉ पद्धतीने स्टॉलचे नंबर काढण्यासाठी २७ एप्रिलला सकाळी अकरा वाजता ग्रंथ महोत्सवाच्या ठिकाणी स्टॉलधारकांची संयुक्त बैठक होणार आहे. सकाळी नऊ ते रात्री नऊ अशी महोत्सवाची वेळ असेल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 APR 2022 पुढारी

# सम्राट अशोक यांनाच प्राचीन भारताच्या सामाजिक-सांस्कृतिक एकीकरणाचे श्रेय

## डॉ. हेमंत तिरपुडे; विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहास प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सम्राट अशोक यांनी प्राचीन भारताला त्याचा एकीकृत राजकीय नकाशा तर प्रदान केला. पण, त्यापुढे जाऊन या देशाचे सामाजिक-सांस्कृतिक एकीकरण करण्याचे श्रेय त्यांचेच आहे, असे प्रतिपादन हैदराबादचे विचारवंत डॉ. हेमंत तिरपुडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सव, आजादी का अमृत महोत्सव व राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्ष अशा संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे आयोजित 'फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहा'च्या उद्घाटन सत्रात 'प्रियदर्शी सम्राट अशोक यांचे कल्याणकारी राज्य' या विषयावर ते ऑनलाईन स्वरूपात बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. तिरपुडे म्हणाले, सम्राट अशोकाने त्या काळात व्यापक प्रभाव निर्माण केला होता की आशिया खंडात एकही मोठे युद्ध झाले नाही. अशोकाच्या शांती व करुणेच्या संदेशाचा हा प्रभाव होता. अशोकाच्या राजकीय व आर्थिक धोरणांचा प्रभाव तर सर्वदूर होता; पण त्याची कारकीर्द नैतिक मूल्यांच्या आग्रहाने दीप्तीमान झाली होती. यामुळेच अशोकस्तंभावरील सिंहमुद्रा व भारतीय राष्ट्रध्वजावरील अशोकचक्र राष्ट्रीय मानचिन्हे बनली आहेत.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, या केंद्राच्या माध्यमातून बाबासाहेबांचे विचार अभ्यासणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा प्रसार तळागाळापर्यंत करण्याची जबाबदारी स्वीकारण्याची मोठी गरज आहे.



**कोल्हापूर : विद्यापीठातर्फे आयोजित फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाच्या उद्घाटनसत्रात हैदराबादहून ऑनलाईन बोलताना डॉ. हेमंत तिरपुडे.**

यावेळी २०२१-२२मध्ये डॉ. आंबेडकर केंद्राच्या पीजी डिप्लोमा व सर्टिफिकेट अभ्यासक्रमांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र व ग्रंथभेट देऊन गौरव करण्यात आला. केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दीपा श्रावस्ती यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. अमोल मिणचेकर यांनी आभार मानले. रविवार (दि.१०) सकाळी १०.३० वाजता 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे समाज परिवर्तनाचे कार्य' या विषयावर अमरावती येथील प्रा. अंबादास मोहिते यांचे ऑनलाईन व्याख्यान होणार आहे.

10 APR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सम्राट अशोकांनी सांस्कृतिक एकीकरण केले

## डॉ. हेमंत तिरपुडे; विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहास प्रारंभ

**कोल्हापूर, ता. ९ :** ''सम्राट अशोक यांनी प्राचीन भारताला त्याचा एकीकृत राजकीय नकाशा तर प्रदान केला; पण त्यापुढे जाऊन या देशाचे सामाजिक-सांस्कृतिक एकीकरण करण्याचे श्रेयही त्यांचेच आहे,'' असे प्रतिपादन हैदराबाद येथील विचारवंत डॉ. हेमंत तिरपुडे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सव, आझादी का अमृतमहोत्सव, राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे आयोजित 'फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहा'चे उद्‌घाटन झाले. 'प्रियदर्शी सम्राट अशोक यांचे कल्याणकारी राज्य' यावर ते ऑनलाईन बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहात कार्यक्रम झाला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाच्या उद्‌घाटन सत्रात बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. डावीकडून प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन.**

डॉ. तिरपुडे म्हणाले, ''सम्राट अशोकाने व्यापक प्रभाव निर्माण केला होता की, आशिया खंडात एकही युद्ध झाले नाही. अशोकाच्या शांती व करुणेच्या संदेशाचा हा प्रभाव होता. अशोकाच्या राजकीय व आर्थिक धोरणांचा प्रभाव तर सर्वदूर होता; पण त्याची कारकीर्द नैतिक मूल्यांच्या आग्रहाने दिप्तीमान झाली होती. यामुळेच अशोकस्तंभावरील सिंहमुद्रा, राष्ट्रध्वजावरील अशोकचक्र आपली राष्ट्रीय मानचिन्हे बनली. आर्थिक विकास, सामाजिक कल्याण, सर्व धर्मांचा समान आदर या त्रिसूत्रीवर अशोकाचे कल्याणकारी राज्य आधारलेले होते. अशोकाने जनतेचे कल्याण करणारी राज्यव्यवस्था निर्माण केली. आधुनिक राज्यघटनेत 'वेल्फेअर स्टेट' संकल्पनेचेच हे प्राचीन रुप म्हणता येईल. महामात्रांपासून ते प्रादेशिकांपर्यंतची बहुस्तरित प्रशासकीय व्यवस्था निर्माण केली. अशोकाने त्याच्या राज्यघटनेत अधिकाऱ्यांना निर्देश, नागरिकांना आचारनिर्देश, नागरिकांसाठी सर्वसाधारण सूचनांचा समावेश होता.''

२०२१-२२ मध्ये डॉ. आंबेडकर केंद्राच्या पीजी डिप्लोमा, सर्टिफिकेट अभ्यासक्रमांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र, ग्रंथभेट देऊन गौरव केला. केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत केले. डॉ. दीपा श्रावस्ती यांनी परिचय करून दिला. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले; तर अमोल मिणचेकर यांनी आभार मानले.

### प्रा. मोहिते यांचे आज व्याख्यान

उद्या (ता. १०) सकाळी साडेदहाला 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे समाज परिवर्तनाचे कार्य' यावर अमरावती येथील प्रा. अंबादास मोहिते यांचे ऑनलाईन व्याख्यान होईल.

10 APR 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्राचीन भारताच्या एकीकरणाचे श्रेय सम्राट अशोक यांचे

## डॉ. हेमंत तिरपुडे : शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहास प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सम्राट अशोक यांनी प्राचीन भारताला त्याचा एकीकृत राजकीय नकाशा तर प्रदान केलाच; पण त्यापुढे जाऊन या देशाचे सामाजिक-सांस्कृतिक एकीकरण करण्याचे श्रेयही त्यांचेच आहे, असे प्रतिपादन हैदराबादचे विचारवंत डॉ. हेमंत तिरपुडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सव, आजादी का अमृतमहोत्सव आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्ष अशा संयुक्त विद्यमाने विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने आयोजित 'फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहा'च्या उद्घाटन सत्रात 'प्रियदर्शी सम्राट अशोक यांचे कल्याणकारी राज्य' या विषयावर ते ऑनलाईन स्वरूपात बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.



कोल्हापूर : फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाच्या उद्घाटन सत्रात मनोगत व्यक्त करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व डॉ. श्रीकृष्ण महाजन.

यावेळी सन २०२१-२२ मध्ये डॉ. आंबेडकर केंद्राच्या पीजी डिप्लोमा व सर्टिफिकेट अभ्यासक्रमांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दीपा श्रावस्ती यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले, तर अमोल मिणचेकर यांनी आभार मानले.

रविवार, दि. १० एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे समाज परिवर्तनाचे कार्य' या विषयावर अमरावती येथील प्रा. अंबादास मोहिते यांचे ऑनलाईन व्याख्यान होणार आहे.

पुण्यनगरी

# महाविद्यालयांनी क्षमता वाढवणे आवश्यक : कुलगुरू शिर्के

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नजीकच्या काळात शैक्षणिक क्षेत्राला नव्या धोरणासह अनेकविध बदलांना सामोरे जावे लागणार आहे. त्यासाठी महाविद्यालयांनी क्षमता ओळखून त्या अधिक वृद्धिंगत करणे आवश्यक आहे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित प्राचार्यांच्या विशेष एकदिवसीय बैठकीच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण केव्हाही लागू होऊ शकते. त्या दृष्टीने विद्यापीठ तयार आहे. महाविद्यालयांनीही तयारीत राहावे; मात्र या धोरणापलीकडेही अनेक नवनवे अभ्यासक्रम, योजना, उपक्रम आणि मूल्यमापनाच्या अभिनव पद्धती विद्यापीठ अनुदान आयोगाच्या माध्यमातून येत आहेत. या बदलांचा नियमित आढावा घेण्यासाठी, त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी महाविद्यालयांनी स्वतंत्र कक्ष निर्माण करावा.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

लोकसत्ता

# डॉ. डी.टी. शिर्के यांना मानद कर्नलपद

कोल्हापूर : राष्ट्रीय छात्र सेनेचे (एन.सी.सी.) राष्ट्रीय मुख्यालयाचे मानद कर्नलपद शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना गुरुवारी बहाल करण्यात आले. या पदाचा बॅज ब्रिगेडियर समीर साळुंखे व कर्नल डी.एस. सायना यांनी त्यांना प्रदान केला. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, ट्रेनिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल समीर मोहिते, लेफ्टनंट कर्नल एस.बी. सरनाईक उपस्थित होते. ब्रिगेडियर साळुंखे म्हणाले, मानद कर्नलपदासाठी देशभरातून एकूण सोळा कुलगुरूंच्या नावांची शिफारस करण्यात आली होती. त्यापैकी मंजुरी मिळालेल्या महाराष्ट्रातील डॉ. शिर्के आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत या दोन कुलगुरूंचा समावेश आहे. डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने नेहमीच एनसीसीला प्रोत्साहन दिले आहे. विविध शिबिरे आणि अन्य उपक्रम यांमुळे परीक्षांना मुकणाऱ्या एनसीसी छात्रांची फेरपरीक्षा घेऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान न होऊ देण्याची दक्षता विद्यापीठाकडून घेतली जाईल.



कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांना एनसीसीच्या मानद कर्नल पदाचा बॅज प्रदान करताना ब्रिगेडियर समीर साळुंखे, कर्नल डी.एस. सायना.